गोदातीर दि.1.8.25



# रेल्वे स्थानकातून मुलीचे अपहरण करणाऱ्या आरोपीची पोलिसांनी काढली धिंड



**नांदेड (प्रतिनिधी)-** शहरातील वजिराबाद पोलिसांनी बुधवार, दि. २९ जुलै रोजी हुजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानक परिसरातून एका असहाय्य मुलीचे अपहरण करणाऱ्या दोघांपैकी एक असलेल्या मोहम्मद खाजा मोहम्मद अयान रा.इकबालनगर, नांदेड याची धिंड काढली. न्यायालयासमोरून ते संपुर्ण रेल्वे स्थानक परिसरात ही धिंड काढली.

यापूर्वी दोन वेळेस नांदेड ग्रामीणचे तत्कालीन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांनी अशी धिंड काढली होती. परत वजिराबादचे पोलीस निरिक्षक परमेश्वर कदम यांनीही आरोपीची धिंड काढून गुन्हेगारांमध्ये भीती तर सर्वसामान्य नागरिकांमध्ये एक विश्वासाचे वातावरण निर्माण केले.

वजिराबादचे पोलीस निरिक्षक परमेश्वर कदम, पोलीस उपनिरिक्षक सुनील बुलंगे, पोलीस अंमलदार साखरे, गव्हानकर, यादव आणि काही गृहरक्षक दलाचे जवान हे यावेळी उपस्थित होते.

या दोन आरोपींनी बुधवारी भरदिवसा रेल्वे स्थानक परिसरातून एका असहाय्य मुलीला जबरदस्तीने उचलून नेऊन परिसरात दहशत पसरली होती, मात्र पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक आणि पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी तातडीने या प्रकरणाची दखल घेत दोन्ही आरोपींना अटक केली. यातील एक जण अल्पवयीन आहे. वजिराबाद पोलीस ठाण्यात पीडित मुलीच्या बहिणीच्या फिर्यादीवरून अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तंपासीक अंमलदार सहायक पोलीस निरीक्षक लोंढे यांनी आरोपीला गुरुवार, दि. ३१ जुलै रोजी नांदेड न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला पोलीस कोठडीत पाठवले आहे.